विषय:- शासकीय जमिनीची मागणी करून जमीन प्रत्यक्षात मंजूर होण्यापूर्वीच जमिनीवर अतिक्रमण करून बांधकाम.....
......जिल्हाधिकारी यांनी कडक कारवाई करणेबाबत...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :एलईएन. १०९६/प्र.क्र. ६०/९६/ज-१
मंत्रालय, मुंबई: ४०००३२.
दिनांक:- १६/१०/१९९६.

पहा:- शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग,
क्रमांक एलईएन. १०९५/प्र.क्र. ६६/ज-१, दिनांक ९.८.१९९५.

## परिपत्रक

ब-याच प्रकरणात असे आढळून आले आहे की, एखाद्या विशिष्ट प्रयोजनासाठी शासकीय जमिनीची मागणी शासनाकडे/ जिल्हाधिका-यांकडे केली जाते व अशी शासकीय जमीन रितसर शासनाकडून मंजूर होण्यापूर्वीच संबंधितांमार्फत शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्यात येऊन अनधिकृत बांधकाम केले जाते व जिल्हाधिका-यांकडून सदर अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठविले जातात. वास्तविक ही प्रथा गैर व अनुचित आहे. भविष्यात अशा प्रकरणांना आळा बसावा म्हणून शासन आता अशा सूचना देत आहे की, मागणी करण्यात आलेली शासकीय जमीन रितसर मंजूर होण्यापूर्वीच त्या जमिनीवर संबंधितांनी अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केल्यास जिल्हाधिका-यांनी अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव शासनाकडे न पाठविता अशा अतिक्रमणाविरुध्द प्रचलित नियम व स्थायी आदेशानुसार कडक कारवाई करून संबंधितांचे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण तात्काळ दूर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ क.को. फिरशीद ]
उप सचिव
महसूल व वन विभाग.

25 OCT 1996

प्रति,